# १७वी लोकसभा निवडणूक २०१९

**डॉ. आण्णासाहेब हारदारे,**
सहाय्यक प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग,शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज.

..........................................................................................................................................

**प्रस्तावना:**

१७ वी लोकसभा निवडणूक देशभरात एकूण सात टप्प्यामध्ये झाली. लोकसभेच्या निवडणुकीबरोबर निवडणूक आयोगाने आंध्रप्रदेश, सिक्कीम विधानसभेच्या निवडणुका ही घेतल्या. सर्व मतदान केंद्रावर VVPAT यंत्रे वापरण्यात आली. त्यामुळे मतदारांनी नोंदविलेले मत त्यांनी दिलेल्या उमेदवारालाच गेल आहे याची मतदारांना खात्री झाली. १७ व्या लोकसभेचा निकाल २३ मे २०१९ रोजी लागला. या निवडणूकीमध्ये भारतीय जनता पक्षाला आणि त्याच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ३०३ जागा मिळाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची व्यक्तीगत लोकप्रियता आणि करीश्मा यामुळे लोकसभा निवडणूकीत भारतीय जनता पक्षाला ऐतिहासिक विजय मिळाला. या लोकसभा निवडणूकीचे निकालाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल.

**अ)व्यक्तीकेंद्रीत निवडणूक:**

भारताने संसदीय शासन पध्दतीचा स्विकार केला असला तरी आपल्याकडील निवडणूका या व्यक्तीकेंद्रीय असतात, असा अनुभव आहे आणि १७ वी लोकसभा निवडणूक ही याला अपवाद नाही. कारण भारतीय मतदारांना केंद्रीत होण्यासाठी किंवा आकर्षित करण्यासाठी एक चेहला लागतोच. केवळ पक्ष, त्याचे तत्वज्ञान, त्याची भूमिका एवढे पुरे होत नाही. ही परिस्थिती लोकशाही मुल्यांच्या दृष्टीने समर्थनीय नाही, पण २०१९ ची लोकसभा निवडणूक ही पंतप्रधान नरेंद्र मोदी विरुध्द इतर अशीच झालेली दिसून येते. भाजपाने १६ व्या लोकसभेत निवडणूक रिंगणात उतरतानाच 'अब कि भाजपा सरकार' या स्लोगनखाली निवडणूक लढवली. पण यावेळी 'फिर एक बार मोदी सरकार' अशी स्लोगनखाली ही निवडणूक भारतीय जनता पक्षाने लढवली आणि जिंकलीही. डॉ. मनमोहन सरकारच्या दुसऱ्या पर्वामुळे राष्ट्रीय पातळीवर नेतृत्वाचा पेचप्रसंग निर्माण झाला. देशाच्या आणि राज्यांच्या निवडणुकीमध्ये मोदींच्या उदयानंतर राष्ट्रीय आधारावरच नेतृत्वाच्या निवडणूका जिंकल्या जावू लागल्या. लोकांना पक्षावर नाही तर नेतृत्वावर मते देण्याची गरज भासु लागली. नेतृत्वावरच विश्वास निर्माण झाला. त्यामुळे या निवडणूकीत नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी नंतर परत व्यक्तीकेंद्रीत निवडणूका दिसून येतात.

**ब)भाजपात मुल्यात्मक बदल:**

१७ व्या लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षामध्ये मुल्यात्मक बदल झाल्याचे दिसून येते. १९८० साली 'केडर बेस' म्हणून स्थापन झालेला भाजपा आज 'मास बेस' कडे वाटचाल करीत आहे. भाजपाने सत्ता संघर्षामध्ये टिकण्यासाठी अंतर्गत मुल्यात्मक डागडुजी केली आहे. भाजपाच्या 'हिंदुत्व' या मुल्य व्यवस्थेबरोबर नरेंद्र मोदींनी विकसित मुल्ये स्विकारली गेली. 'मोदीवाद' म्हणजे 'सबका साथ सबका विकास' अशी शुध्द राजकीय प्रणाली विकसित झाली. त्यामुळे 'विकासवाद' हे या निवडणूकीचे वैशिष्टय ठरले आणि या लोकसभा निवडणूकीत भारतीय जनता पक्षाला ऐतिहासिक विजय मिळाला नाही तर लोकसभेच्या जागाही वाढल्या. दलित, मुस्लीम, ओबीसी आणि आदिवासीमधील भाजपाचा जनाधार वाढून जातीच्या विशिष्ट अजेंडयावर राजकारण करणाऱ्या पक्षांचा पराभव झाला.

**क)राष्ट्रीय भावनात्मक राजकारण**:

गेल्या ७५ वर्षाच्या काळात प्रत्येक राजकिय पक्ष सार्वत्रीक निवडणूकीला सामोरे जात असताना एका विशिष्ट जाती, धर्माच्या, प्रदेशवादाच्या अजेंडयाखाली राजकारण करत असतो. पण १७ व्या लोकसभेच्या सार्वत्रीक निवडणूकीचा विचार करता 'नरेंद्र मोदी' यांनी राष्ट्र, राष्ट्रभक्ती, देशभक्ती आणि भावनात्मक राजकारणाची सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी 'मै भी चौकीदार हू' या टॅग खाली भारत भ्रष्टाचार मुक्त करण्याची तरुणांनी किंवा भारतीय नागरीकांनी आशा दाखवली. मी देशाचा चौकीदार आहे. 'ना मै खाऊंगा ना मै खाने दुंगा' अशी घोषणा केली. त्यानंतर पुलवामा हल्ला, बागलकोट हल्ला अशा अनेक कारणामांचे राजकारण करत भारतीय जनतेच्या मनात राष्ट्रभक्ती निर्माण करुन भावनात्मक राजकारण केले. तुम्ही दिलेले भाजपला मत हे 'लष्कराच्या

**बलीदानाला** आहे' अशा प्रकारची भूमिका घेतली. व राष्ट्रीय प्रेम व देशभक्तीचे नरेंद्र मोदींनी भावनात्मक राजकारण केले त्यामुळे त्याचा विजय झाला.

**ड)डिजीटल माध्यमांचा वापर:**

१७ व्या लोकसभेच्या निवडणूकीचा विचार करता पक्षाच्या संघटन व प्रचार करण्याच्या पध्दतीमध्ये डिजीटल माध्यम प्रभावी ठरल्याचे दिसून येते. भाजपा आणि काँग्रेसच्या लोकसभा सत्तास्पर्धेमध्ये डिजीटल माध्यमांनी राजकारणाचा सार्वजनिक प्रचाराचा मंच अतिगतीशील बनवला. देशातील तरुण साक्षर आहे. इंटरनेटमुळे त्याचे जगाचे व भारताचे आकलन वाढले आहे. दुरदृष्टी व्यापक झाली आहे. त्यामुळे जातीपातीचे राजकारण न करता सत्ताधारी भाजपासह सगळयाच राजकीय पक्षांनी डिजीटल माध्यमांच्या मार्गे तरुणांच्या समोर विकासाचा पर्यायी अजेंडा मांडून तरुणांचे प्रश्न जाणून घेण्याचा प्रयत्न केला. नागरी समाज आणि सार्वजनिक अवकाश यांच्यामध्ये व्हॉट्सअॅप, फेसबुक आणि टिव्टर यांच्या माध्यमातून एकोपा घडवून आणण्यात भाजपाला यश मिळाले. आणि त्यांनी 'डिजीटल स्वयंसेवक' नावाची एक राजकीय कार्यकर्त्याची नवीन संकल्पना देशासमोर आणली.

**ई)भाजपाचे संरचनात्मक बदल**:

आजपर्यंत भारतीय जनता पक्ष हिंदुत्व केंद्रीत राजकारण करतो आणि काँग्रेस सर्वसमावेशक राजकारण करतो, ही टिका खोडून काढण्यात भारतीय जनता पक्ष या निवडणूकीत यशस्वी झाल्याचे दिसते. १६ व्या लोकसभेच्या विजयानंतर भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वामध्ये अमुलाग्र बदल झाला. तसा तो काँग्रेसमध्ये राहुल गांधी यांच्या उदयामुळे झाला असला तरी त्याला जनतेचे फारसे पाठबळ मिळाले नाही. पण भाजपामध्ये जुने नेतृत्व दुसऱ्या स्थानावर सरकुन नरेंद्र मोदी, अमित शहा यांचे नव्याने नेतृत्व राष्ट्रीय पातळीवर उदयाला आले. त्यांनी भारतीय राजकारणाचा सर्व अवकाश व्यापला, त्यामध्ये नवीन नेतृत्वाने पक्षाची मुल्यात्मक डागडुजी करुन हिंदुत्वाबरोबर स्वत:ची अशी 'मोदीवाद' अशी एक शुध्द राजकीय प्रणाली विकसित केली. त्यामध्ये 'योजनाकेंद्रीत' संघटन करण्यावर भर दिला. 'विकासवाद' हे या निवडणूकीचे वैशिष्टये बनविले. गाव, बुथ, चौक अशा पातळयावर जाऊन १६ व्या लोकसभेच्या किंवा गेल्या चार वर्षातल्या कामगिरीचे सादरीकरण स्वत: आणि भाजपा कार्यकर्त्यांनी सलग १५ दिवस केले. भाजपने योजना केंद्रीत संघटन करुन परंपरागत मतांची सिमारेषा ओलांडून भाजपा देशातल्या प्रत्येक घरात पोहचला. योजना आणि गाव थेट घर अशी सांधेजोड केली. मोदी आणि अमित शहा यांनी नेतृत्व, संघटन विचारधारा आणि विकासात्मक राजकारण यांच्यात सांधा जोडून प्रचार केला. त्यांनी अर्थ पेज प्रमुख, पेज प्रमुख, बुथ प्रमुख, संपर्क प्रमुख अशा छोटया—छोटया शाखा सुरु केल्या. त्यांना डिजीटल यंत्रणेशी जोडले आणि तळागाळात राजकीय संघटन करण्याचे कार्य केले. हिंदुत्वाबरोबर रचनात्मक कार्यक्रम यातून राजकीय एकसंघीकरण करुन १७ व्या लोकसभेत भाजपाने अभुतपूर्व विजय मिळवला.

**ई)काँग्रेसचा व्यवस्थात्मक ऱ्हास:**

संयुक्त पुरोगामी लोकशाही आघाडीच्या पहिल्या पर्वात काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या पंतप्रधान पदाच्या माघारीमुळे काँग्रेसला नव संजीवनी मिळाली. या सोनिया गांधींच्या निर्णयामुळे काँग्रेस पक्षाची प्रतिष्ठा व जनाधार वाढला. त्याचा परिणाम १५ व्या लोकसभेत झाला. या निवडणूकीनंतर परत काँग्रेस आघाडीचा डॉ. मनमोहन सिंगांचा दुसरा कालखंड हा नेतृत्वाचा पेच प्रसंगाचा ठरला. कारण या काळात पंतप्रधान म्हणजे कटपुतली असा झाला. त्याचा परिणाम असा झाला की, सरकारमधील घटक पक्षांनी त्याचा गैर फायदा घेतला व काँग्रेसला बदनाम केले. त्याच पार्श्वभूमीवर भाजपामध्ये भाजपचे नरेंद्र मोदीचे नेतृत्व राज्याकडून भारतीय राजकारणात आले. गेल्या दहा वर्षाच्या काळात काँग्रेसने सत्तेचा वापर पक्ष विस्तारासाठी केला नाही तर आघाडीतील बिघाडीवर लक्ष केंद्रित केले. त्यामुळे विकास आणि पक्षाची वैचारीक मुल्ये यांच्यात तफावत निर्माण झाली. त्यामुळे काँग्रेसचा जनाधार कमी झाला. काँग्रेसचा सत्ता हाच बेस आहे हेच लोकांच्या मनात रुजले. त्याचबरोबर काँग्रेसमधील अनावश्यक व्यक्तीच वर्षानुवर्षे पदाधिकारी म्हणून राहिले. त्यांनी तळागाळापर्यंत आपले नवीन राजकीय संघटन केले नाही. त्यामुळे काँग्रेस १६ व्या लोकसभेत ४४ सदस्यापर्यंत पोहचला आणि ते स्वाभाविक होते. लोकसभेतील या दारुण पराभवामुळे काँग्रेस पक्ष हादरला. या निवडणूकीतील पराभवाचे विचारामंथन करण्यापेक्षा पक्षाने पक्ष नेतृत्व बदलावर लक्ष केंद्रित करुन पराभवाकडे दुर्लक्ष केले आणि राहुल गांधींना पक्ष अध्यक्षांची सुत्रे दिली. काँग्रेस पक्षाच्या

अध्यक्ष पदावर निवड होणारे राहुल गांधी हे नेहरु—गांधी घराण्यातील ६ वे सदस्य होते. त्यांच्या या निवडीमुळे घराण्याशाहीची टिका झाली. त्याचबरोबर १६ व्या लोकसभेतील पराभवामुळे पक्षात विस्कळीतपणा निर्माण झाला, पक्ष सदस्य, पदाधिकाऱ्यामध्ये सुसंवाद नाही, धोरणात्मक बांधणी नाहीआणि केवळ घराण्यावरच किंवा गांधी कुटूंबाची महिती सांगून मते मिळतातच असे नाही हे सिध्द झाल्यामुळे पक्षाची विश्वासार्हता धुळीस मिळाली, आणि पक्षाचा संस्थात्मक ऱ्हास झाला. त्यामुळे १७ व्या लोकसभेत कॉंग्रेसला भारतीय जनतेने साफ नाकारले. ही कॉंगेसची पडझड म्हणजे कॉंग्रेसचा संरचनात्मक किंवा व्यवस्थात्मक ऱ्हास आहे.

**संदर्भः**

१. पळशीकर सुहास व सुहास कुलकर्णी,२००७, महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष समकालीन प्रकाशन,पुणे.

२. राज्याच्या राजकारणाची नवीन रूपरेषासंपादकीय डॉ.प्रकाश पवार.

३. पळशीकर सुहास व नितीन बिरमल, संपा (२००४, २००७), महाराष्ट्राचे राजकारण, राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

४. bbc-com महाराष्ट्रातील निकाल म्हणजे मोदी मोडेल वर लागलेला अंकुश विश्लेषण.

५. राज्याच्या राजकारणाची नवीन रूपरेषा संपादकीय डॉ.प्रकाश पवार.